# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 11.03.2026** **वार- बुधवार**

---

**बारामती-यादी**

बारामती विधानसभा मतदारसंघाच्या आगामी पोटनिवडणुकीच्या अनुषंगानं अंतिम मतदार यादी काल प्रकाशित करण्यात आली आहे. या अंतिम यादीनुसार मतदारसंघातील मतदारांची संख्या ३ लाख ८३ हजार ७६७ झाली आहे. यादीवर ९ ते २५ फेब्रुवारी या कालावधीत दावे आणि हरकती स्वीकारण्यात आल्या.

**लाट**

पुणे शहरात तापमानात सातत्यानं वाढ होत असल्यानं उष्णतेच्या लाटेची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी स्वतःच्या आणि कुटुंबियांच्या आरोग्याची विशेष काळजी घेणं गरजेचं आहे. उष्माघात टाळण्यासाठी पुणे महानगरपालिकेने स्पष्ट मार्गदर्शन जारी केलं आहे. गुरांना छावणीत ठेवा, त्यांना हिरवा चारा आणि पुरेसं पाणी उपलब्ध करून द्या. कामाच्या ठिकाणी थंड पाण्याची सोय करणंही आवश्यक आहे असं या सूचनांमध्ये म्हटलं आहे.

**सिकलसेल**

राज्यातील सिकलसेल आजाराचा प्रादुर्भाव अधिक असलेल्या जिल्ह्यांमधील रुग्ण शोधण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत 9 हजार 700 नवे सिकल सेल रुग्ण आणि 82 हजारांहून अधिक सिकल सेल वाहक रुग्णांची ओळख पटली आहे. ही मोहीम संपूर्ण राज्यात राबविण्यात आली असली, तरी आजाराचा प्रादुर्भाव जास्त असलेल्या 21 जिल्ह्यांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आलं.

**कट्टा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील 'विद्यापीठ कट्टा' या उपक्रमामुळं सत्तावीसहून अधिक विद्यार्थी सेट आणि नेट परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. यामध्ये महिला परीक्षार्थींची संख्या सर्वाधिक असून विवाहित महिलांचं प्रमाणही लक्षणीय आहे. 'विद्यापीठ कट्ट्या'च्या वतीनं नुकताच या यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार आणि स्नेहमेळाव्याचं आयोजन करण्यात आलं होतं. या कार्यक्रमात प्रत्यक्ष उपस्थित २१ विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला आणि त्यांनी आपलं मनोगत व्यक्त केलं. विद्यापीठ कट्ट्याच्या वतीनं गेल्या दोन वर्षांत नेटच्या चार आणि सेटच्या दोन परीक्षांची तयारी करून घेण्यात आली. यासाठी तज्ज्ञांच्या मोफत व्याख्यानांचं आयोजन केलं जातं. आतापर्यंत २३ विद्यार्थी नेट, ७० विद्यार्थी सेट आणि ७८ विद्यार्थी पीएचडी पात्रता परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. पुणे आणि परिसरातील जिल्ह्यांतील विद्यार्थीही या मार्गदर्शनाचा लाभ घेतात.

**बैठक**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शहर सुधारणा समितीच्या आज झालेल्या बैठकीत शहर विकासाशी संबंधित विविध महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. शहरातील स्वच्छता व्यवस्था अधिक सक्षम करणं तसंच व्यापार आणि उद्योगांना आवश्यक परवानगी पारदर्शक आणि सुलभ पद्धतीनं देण्याची सूचना सभापती शत्रुघ्न काटे यांनी संबंधित विभागांना केल्या.
मोशी इथं उभारण्यात येत असलेल्या दुसऱ्या कचऱ्यापासून उर्जा प्रकल्पाच्या कामाला गती देण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी महापौर रवि लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली आज आढावा बैठक पार पडली. शहरातील भटक्या श्वानांच्या व्यवस्थापनासोबतच त्यांचं संगोपन, आरोग्य सेवा आणि नागरिकांच्या तक्रारींचं प्रभावी निवारण यासाठी ठोस उपाययोजना करणं, पिंपरी चिंचवड शहरात श्वान संगोपन केंद्रासाठी प्रभागनिहाय जागा शोधणं इत्यादि सूचना महापौरांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

**हप्ता**

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा डिसेंबर 2025 ते मार्च 2026 या कालावधीचा बाविसावा हप्ता पंतप्रधानांच्या हस्ते परवा 13 तारखेला सायंकाळी पाच वाजता वितरित करण्यात येणार आहे अशी माहिती पुण्यातील कृषी आयुक्तालयाचे कृषी संचालक (विस्तार आणि प्रशिक्षण) यांनी एका पत्रकाद्वारे दिली आहे. राज्यातील सद्यस्थितीत पात्र 91 लाख 19 हजार शेतकरी कुटुंबांना 1 हजार 837 कोटी रुपये त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट हस्तांतरणाद्वारे जमा होणार आहेत. राज्यातील कृषी विज्ञान केंद्र तसंच जिल्हा, तालुका आणि ग्राम पंचायत स्तरावर विविध ठिकाणी हा कार्यक्रम एकाचवेळी आयोजित करण्यात येत आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात उद्या कमाल 36 तर किमान 16 अंश सेल्सियस तापमान राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**